**प्रकल्प प्रवर्तक मे. श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या, माऊली नगर, बेलकूंड तालुका औसा जिल्हा लातुर महाराष्ट्र यांचा मु. पो. बेलकुंड, ता. औसा, जि. लातूर - (413520) , महाराष्ट्र येथील प्रस्तावित ऊसाचा रस /मोलॅसीसवर आधारीत 105 किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत्त-**

प्रकल्प प्रवर्तक मे. श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या, माऊली नगर, बेलकूंड तालुका औसा जिल्हा लातुर महाराष्ट्र यांच्या गट नं. 363,375 मु. पो. बेलकुंड, तालुका औसा, जिल्हा लातूर - (413520) , महाराष्ट्र येथील प्रस्तावित ऊसाचा रस / मोलॅसीसवर आधारीत 105 किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरूवार, दिनांक 24 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता प्रकल्प स्थान - मे. श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या, मु. माऊली नगर, बेलकूंड ता. औसा जि. लातूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री परमेश्वर व्ही. नाईक ,उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. केशव नेटके साहेब, मा. अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर तथा पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावनीचे अध्यक्ष, श्री. मनिश होळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा जनसुनावनीचे सदस्य प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी व मोठया संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करून माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरू केली.

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती चे आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण ,वने व हवामान बदल मंत्रालय , नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर 2006 व सुधारीत दिनांक 1 डिसेंबर 2009 आणि 14 ऑगष्ट 2018 च्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक अनुमती घेणे बंधनकारक असुन त्यासाठी आगावु पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

सदरहु प्रकल्प पयार्वरण अधिसुचना 2006 आणि सुधारित नुसार संवर्ग ए- आसवणी -5 (जी) वर्गात मोडत असुन आसवणी प्रकल्प 105.00 किलो लिटर प्रति दिन असल्याने सदरहु प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय , भारत सरकार नवी दिल्ली यांची " पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मुळ उद्देष प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणुन घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदुषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार , नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (TOR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक 23/07/2025 रोजी सादर केला व अर्जास ऑनलाईन मंजुरी दिनांक 25/07/2025 रोजी प्रदान केली. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प परिघाच्या 10 कि.मी. अंतरापर्यंतचे सर्व बेसलाईन सर्वेक्षण करून प्रारूप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करून शासनास सादर केलेला आहे.

आयोजक , पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या, माऊली नगर, बेलकूंड ता. औसा जि. लातूर, महाराष्ट्र यांच्या गट नं. 363, 375 मु. पो. माऊली नगर बेलकुंड ता. औसा जि. लातूर 413520, महाराष्ट्र येथील प्रस्तावित ऊसाचा रस /मोलॅसिसवर आधारित 105.00 किलो लिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी प्रतिदिन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज दिनांक 29/10/2025 रोजी सादर केला.

सहसंचालक, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या पत्र दिनांक 04/11/2025 नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सुचना केली.

जिल्हाधिकारी, लातूर यांनी प्रत्यक्ष पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार , दिनांक 24 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 11.30 वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव , महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक 14/09/2006 व सुधारीत अधिसुचना दिनांक 01/12/2009

अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. E- 91/2025, व्दारा पत्र क्र. BO/JD(WPC)PH/B-251223-FTS- 0188 दि. 23/12/2025 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठीत केली:-

त्यानुसार समितीचे अध्यक्ष मा. अपर जिल्हादंडाधिकारी, लातूर, समितीचे आयोजक उप प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर, समिती सदस्य प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजी नगर हे आहेत.

सदरहु अधिसुचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी , महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर यांनी जनसुनावणी दिवसाच्या 30 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत, मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया, इंग्रजीत दिनांक 21/11/2025 रोजी जनसुनावणीबाबत जाहिर सुचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहु प्रकल्पा बाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ खालील अधिसुचित शासकीय कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता.

1) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, इस्ट विंग, सिव्हील लाईन्स , नागपुर- 440001.

2) मा. जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, ता. व जि. - लातूर.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद , लातूर, ता. व जि. - लातूर.

4) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र , लातुर, ता. व जि. - लातूर.

5) तहसीलदार, तहसील कार्यालय, औसा, ता. औसा, जि. लातूर.

6) सरपंच/ग्रामसेवक , ग्रामपंचायत कार्यालय - चिंचोली ,शिवली, वरवडा, एलोरीवाडी, कोरंगळा, समदर्गा, सिंदाळवाडी, एलोरी ,रिंगणी, बिरवली, टाका, बोरफळ , मासुर्डी, गुळखेडा, बेलकुंड, चिंचोलीसोन, तुंगी( बु), तुंगी( खु), दापेगाव, मसलगा, माळुंब्रा, हिप्परगा, तावषीताड, चिंचोली काजळे, एकंबी लमानतांडा , आशिव, वांगजी, कवळी, मातोळा, माळकोंडजी, ता. औसा, जि. लातूर.

7) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग , महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, 15 वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - 400032.

8) सदस्य सचिव, महाराश्ट्र प्रदुशण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3 रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं.8 शीव (पुर्व) , मुंबई- 400022.

9) प्रादेशिक अधिकारी , महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, भुखंड क्रं. ए-4/1 , पर्यावरण भवन, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धुत हॉस्पिटल शेजारी, जालना रस्ता, छत्रपती संभाजी नगर - 431210,

10) उप प्रादेशिक अधिकारी , महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ , भुखंड क्र. पी-10, लातूर जिल्हा उद्योग समुह इमारत, एम.आय.डी.सी. लातुर -413531.

11) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ , मुंबई.

उपरोक्त प्रकल्पा विषयी आजतागायत उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर यांना कोणत्याही सुचना किंवा आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावीत प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप , हरकती, सुचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असुन ते लेखी वा तोंडी स्वरूपात ती देवु शकतात असे सांगीतले.

आयोजक यांनी सांगितले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरण विषयक मत , सुचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असुन प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सुचना / आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहु बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सुचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण , बैठकीचे इतिवृत्त, प्राप्त झालेल्या लेखी सुचना/ आक्षेप सोबत जोडून पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार , नवी दिल्ली यांना अध्यक्ष , पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरू करण्याचे आदेश दिले.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या, माऊली नगर, बेलकूंड ता. औसा जि. लातूर, महाराष्ट्र यांच्या गट नं.363, 375 मु. पो. माऊली नगर बेलकुंड ता. औसा जि. लातूर, 413520 महाराष्ट्र येथील प्रस्तावीत प्रकल्पात ऊसाचा रस /मोर्लेसिसवर अधारीत 105.00 किलो लिटर

प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास रितसर अर्ज दिनांक 29/10/2025 रोजी सादर केला.

सदरहु प्रकल्प पर्यावरण अधिसुचना 2006 आति सुधारित नुसार संवर्ग ए - आसवणी -5 (जी) या संवर्गात मोडतो.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावीत प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजने विषयी सविस्तर माहीती दिली. प्रस्तावीत प्रकल्पातील नविन आसवणी प्रकल्प उभारणीसाठी एकुण किंमत 57.00 कोटी असुन पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी (EMP) भांडवली खर्च रूपये 41.50 लाख, तर आवर्ती खर्च 0.5% रूपये 0.66 लाख /वार्षिक येईल. साखर कारखाना 140 दिवस , तर आसवणी प्रकल्प हा 300 दिवस कार्यान्वित राहील. सदरहु प्रकल्प हा झेडएलडी- शुन्य द्रव निःस्सारण प्रकल्प आहे. प्रस्तावित प्रकल्पात कुशल व अकुशल कामगारांची आवश्यकता असुन प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधी प्राप्त होईल. तसेच प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. हरितपट्टा विकसित करताना केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक निर्देशानुसार स्थानिक वृक्ष, प्रजाती, तसेच प्रामुख्याने प्रदुषण पातळी कमी करणा-या वनस्पती प्रजाती लावण्यास प्राधान्य देण्यात येईल.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सुचना, टीका टिप्पणी, आक्षेप नोंदविण्याची परवानगी देण्यात येत आहे. सुचना , आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न, सुचना, आक्षेप व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

1) श्री. विनोद पद्माकर भोसले, राहणार- मातोळा ता. औसा जि. लातूर. (413520)

प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत जो घनकचरा निर्माण होईल, त्याचा परिसरावर काही दुष्परीणाम होईल का ?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारा कचरा म्हणजे बगॅसपासुन उत्पन्न होणारी राख त्यात पोटॅशचे प्रमाण चांगले असल्याने परिसरातील शेतक-यांना शेतात खत म्हणुन उपलब्ध करण्यात येईल. तसेच उत्पादन प्रक्रियेत उत्पन्न होणारे प्रेसमडवर प्रक्रिया केल्यास त्याचा खत म्हणुन वापर करण्यात येवु शकतो. यामध्ये कुठल्याही प्रकारचा घातक घटक नसल्याने परिसरात, शेतात कुठल्याही प्रकारचा दुष्परिणाम होणार नाही.

2) श्री सुर्यकांत मधुकर सावंत, रा. बोरफळ ता. औसा, जि. लातूर -413520

कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेमुळे परिसरातील नागरिकांना आवाजाचा त्रास होईल काय ?.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्प उत्पादन प्रक्रियेत ध्वनी उत्पन्न होण्याचे स्त्रोत म्हणजे बॉयलरचा वापर ब्लोअर्स, त्यासाठी ध्वनी उत्पन्न होणा-या मशिन्ससाठी अत्याधुनिक ध्वनी प्रदुषण नियंत्रण संयत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. ध्वनी प्रदुषण टाळण्यासाठी सर्व प्रक्रिया बंधिस्त जागेतच करण्यात येतील. तसेच ज्या विभागात ध्वनी निर्माण होतो, तेथे काम करणा-या कामगारांना ईअर प्लग्स आणि ईअर मग्स उपलब्ध करण्यात येतील. प्रकल्पात ध्वनीची पातळी ही शासनाने पारित केलेल्या मानकांप्रमाणेच असेल. त्यामुळे कारखान्याबाहेरील जवळील गावांना, कारखाना परिसरातील रहिवाशांना प्रकल्पातील आवाजाचा त्रास होणार नाही.

3) श्री विष्णू निवृत्ती कोळी , राहणार - बेलकुंड ता. औसा जि. लातूर -413520

प्रस्तावित प्रकल्पातुन निघणाऱ्या दुषित पाण्यावर प्रक्रिया करून पुर्नरवापर करावा व पाणी कारखाना परीसराच्या बाहेर जावु नये याची दक्षता घ्यावी ? गावातील सरपंच श्री. विष्णु निवृती कोळी यांनी सांगितले की प्रस्तावित कारखाना विस्ताराबाबत ते समाधान व्यक्त करीत आहेत. मात्र, विद्यमान कारखान्यातून निर्माण होणा-या सांडपाण्याच्या प्रक्रिया व विल्हेवाट व्यवस्थे बाबत त्यांनी आपली चिंता व्यक्त केली. विशेषतः साखर कारखान्यातून निर्माण होणारे सांडपाणी योग्य व प्रभावी पद्धतीने प्रक्रिया करण्यात यावे, जेणेकरून परिसरातील तसेच जवळच्या जलस्रोतांचे कोणत्याही प्रकारे प्रदूषण होणार नाही, अशी सूचना त्यांनी केली व कारखाना व्यवस्थापन यांनी माहिती दिली की सदरहु प्रकल्प हा शुन्य द्रव निःस्सारण - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प आहे. प्रकल्पातुन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. आसवणी प्रकल्पात उत्पन्न होणारा स्पेंट वॉश हा मल्टी इफेक्ट ईव्हॅपोरेशन मध्ये कॉन्सटेंट करणार म्हणजेच त्याची घनता ५० ते ६० टक्के कमी करणार व ते ड्रायरमध्ये त्याचे पावडर स्वरूपात रूपांतर करणार व ते पावडर तज्ञांकडुन तपासणी करून योग्य आहे याची खात्री करून शेतक-यांना शेंद्रीय खत म्हणुन उपलब्ध करून देणार. तसेच प्रोसेस कन्डेनसेट आणि स्पेंट लीस हयावर कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट या संयत्रणेत प्रक्रिया करून परत आसवणी प्रकल्पात वापरण्यात येणार आहे. त्यामुळे कुठलेही प्रक्रिया केलेले सांडपाणी हे प्रकल्पाबाहेर सोडण्यात येणार नाही. याची दक्षता प्रकल्प व्यवस्थापना कडुन घेण्यात येईल.

4) श्री. मनिश होळकर, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजीनगर तथा सदस्य , पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती:-

प्रकल्पात $CO_2$ उत्सर्जन किती होईल व त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कोणत्या कायमस्वरूपी योजना प्रस्तावित आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की उत्पादन प्रक्रियेत साधारणपणे 50 ते 55 घनमीटर $CO_2$ चे उत्सर्जन होईल. पर्यावरण ,वने व हवामान बदल मंत्रालय , भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या निर्देशानुसार $CO_2$ स्क्रब करून त्यांची रिकवरी केली जाईल तथा मार्केट उपलब्धते प्रमाणे रूपांतर केले जाईल.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सुचना केली की भविष्यात प्रस्तावीत असलेल्या CBG प्रकल्प उत्पादनात उत्पन्न होणारी लिक्विड स्लरी ही शेतक-यांना उपलब्ध करून देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की भविष्यात बायोगॅस उभारणीचा आमचा मानस आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की अतिशय सुंदर व प्रकल्पाच्या हिताची सुचना दिलेली आहे.

आयोजक , पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावीत प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सुचना , आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्ष , पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना मार्गदर्शन करण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे आपण प्रकल्प प्रवर्तक मे. मे. श्री संत शिरोमणी मारूती महाराज सहकारी साखर कारखाना मर्या, माऊली नगर, बेलकुंड ता. औसा जि. लातूर यांच्या प्रस्तावीत ऊसाचा रस/मोलॅसिसवर आधारीत 105 किलोलिटर प्रतिदिन आसवणी प्रकल्प स्थापन करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्र जमलेलो आहोत. प्रकल्पाचे सादरीकरण प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी केलेले आहे.त्यात त्यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी संपुर्ण माहिती दिलेली आहे. स्थानिकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी तिघा जनांचे आक्षेप आणि सुचना उपस्थित केलेल्या आहेत. प्रोसेडींग मध्ये त्यांचा लेखी खुलासा आला पाहीजे. त्याचबरोबर प्रादेशिक अधिकारी यांनी मांडलेल्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर आले पाहीजे. प्रदुषणाबद्दल आलेल्या सुचनांचे प्रकल्पाच्या आराखडयात नियोजन आले पाहीजे. जल, वायु, मृदा प्रदुषण होवु नये याची दक्षता घ्यावी जनसुनावणीसाठी उपस्थीत सर्वजन हा प्रकल्प होण्यासाठी सकारात्मक आहेत. त्याच बरोबर कोणतेही प्रदुषण होवु नये याची दक्षता घ्यावी. प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. या सर्वांची नोंद घेण्यात आलेली असुन त्यांचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल व ते इतिवृत्त केंद्र शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सुचना, आक्षेप , टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे परत आवाहन केले.

मा. अपर जिल्हादंडाधिकारी यांनी या सार्वजनिक सुनावणीचा समारोप खालील शब्दांत केला, तसेच अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमूद केले की प्रवर्तकाने जाहीर जनसुनावणीच्या इतिवृत्तांमध्ये नागरिकांच्या सगळया सूचना आणि आक्षेपांचा खुलासा समाविष्ट केला पाहिजे. तसेच इतिवृत्तांमध्ये देखील नोंद घेतली गेली पाहिजे. त्याच बरोबर प्रादेशिक अधिकारी साहेबांनी जे प्रश्न मांडलेले आहेत त्याची सविस्तर उत्तरे देखील प्रोसिडिंग मध्ये आली पाहिजेत. पर्यावरणीय सल्लागारांनी नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरे भविष्यात करू अशी नाही दिली पाहिजे, सल्लागाराकडे ते प्लॅन मध्ये पाहिजे. हवा आणि पाणी प्रदूषणासाठी उपाययोजना नियोजित केल्या पाहिजे. आक्षेप कर्त्यांचे प्रश्न व सरपंचांचे प्रश्न यांची उत्तरे प्रोसिडिंगमध्ये आली पाहिजेत, भविष्यात करू किंवा केले जातील त्यापेक्षा त्यासाठीच्या उपाययोजना केल्या पाहिजे व त्याची उपाययोजना या प्रकल्पामध्येच करावी लागेल. प्रकल्पासंबंधीत सगळया उपाययोजना व प्रश्नांची उत्तरे प्रवर्तकाने दिली आहेत, या सर्वांचा जनसुनावणी इतिवृतामध्ये समावेश करून ते पर्यावरण मंत्रालयाकडे पाठवले जातील. सर्वानीच हा प्रकल्प सकारात्मकदृष्ट्या घेतला आहे. या गावचे पदाधिकारी, शेतकरी सगळ्यांसाठी हा प्रकल्प हवा आहे परंतु, प्रदूषणासंबंधित ज्या समस्या आहेत त्या निर्माण नाही झाल्या पाहिजेत अश्या अपेक्षा सर्वानी व्यक्त केल्या व प्रवर्तक नक्कीच त्या गोष्टीची काळजी घेतील. सर्वानी या जनसुनावणीसाठी सहकार्य केले शांततेमध्ये प्रकल्प समजून घेतला त्याबद्दल सर्वांचे आभार , कारखाना व्यवस्थापनाचे व उपस्थित नागरिकांचे आभार, प्रादेशिक अधिकारी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे इतर अधिकारी यांचे देखील आभार.

कारखाना व्यवस्थापन व प्रवर्तकांनी मा. अपर जिल्हादंडाधिकारी साहेबांच्या सुचनेनुसार इतिवृत्तामध्ये नागरिकांच्या सगळया सुचना आणि आक्षेपांचा खुलासा समाविष्ठ केला आहे. त्याचबरोबर प्रादेशिक अधिकारी साहेबांनी मांडलेल्या प्रश्नाची सविस्तर उत्तरे प्रोसेडींगमध्ये घेतलेली आहेत.पर्यावरण सल्लागारांनी नागरिकांच्या प्रश्नाची उत्तरे भविष्यात करू असे म्हंटले होते मा. अपर जिल्हादंडाधिकारी साहेबांच्या सुचनेनुसार ते ई-आय-ए प्लॅनमध्ये समाविष्ठ केले आहे. हवा आणि पाणी प्रदुषणाच्या शुन्य द्रव निःस्सारण - झिरो लिक्विड डिस्चार्ज उपाय नियोजित आहे. बेलकुंड गावचे सपरंच यांचे प्रश्न आणि उत्तर प्रोसेडींगमध्ये घेतले आहे. प्रदुषणा संबंधीत ज्या समस्या आहेत त्या समस्या निर्माण होणार नाहीत याची काटेकोर आमलबजावणी कारखाना व्यवस्थापन घेवुन प्रदुषण मंडळाच्या सर्व अटी व शर्तीचे पालन करेल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांचे आभार मानुन जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(परमेश्वर व्ही.नाईक)**
आयोजक
पर्यावरण विषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर

**(मनिश होळकर)**
सदस्य
पर्यावरण विषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर

**(श्री केशव नेटके )**
अध्यक्ष,
पर्यावरण विषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी ,लातूर, जि. लातूर.